(प्रपंचातील सर्व व्यवहार) टाकून ते लोकांच्या कल्याणाकरिता शिरडीत प्रकटले होते. शिरडीत नाना चोपदाराची आई अति वृद्ध होती. तिने साईबाबांच्या वागण्याचे (चरिताचे) मोठे कौतुक सांगितले. ती म्हणे, सुरूवातीला हे गोरे-गोमटे, अति सुंदर पोर निंबाच्या झाडाखाली आसन घालून स्वस्थ बसलेले दृष्टीस पडले (दृश्+गोचर झाले). त्याचे सुंदर लहान रूप पाहून लोकांच्या मनाला खूप आश्चर्य (अमूप विस्मय) वाटले. कोवळ्या वयात हे खडतर (कठोर) तप? थंडी (शीत) व ऊन (आतप) एक सारखेच? वय अगदी लहान आणि असे कौतुकास्पद वागणे (नवल स्थिति)? सगळे गावकरी आश्चर्यचकित झाले आणि (या) मुलाच्या दर्शनाला गावोंगावचे लोक येऊ लागले. दिवसा कोणाची संगत (मिळणेजुळणे) नाही. रात्री कसली भीती नाही. ही बालमूर्ती कोठून आली, याचे सगळ्यांच्या मनात आश्चर्य वाटत होते. बांधा अत्यंत सुंदर (रूपरेखा अति गोजिरी); पाहताच अंत:करणात प्रेम दाटून येत असे. तो कोणाच्या घरीदारी जात नसे. रात्रंदिवस (अहर्निश) निंबवृक्षाजवळ बसत असे. जो तो खूप आश्चर्य करीत असे की, कोवळ्या (लहान) वयाचे आणि मोहक (मनोहर) रूपाचे हे पोर रात्रंदिवस उघड्यावर कसे राहत असेल? बाहेरून (बाह्यात्कारी) हा पोर वाटतो, परंतु कृतीने हा थोराहून थोर (मोठा) आहे; जणूकाय वैराग्याचा पूर्ण अवतारच! सगळ्यांना मोठे नवल वाटले. (ओ. ११०-१२३)

एके दिवशी आश्चर्यकारक गोष्ट घडली. दोघाचौघांच्या अंगात खंडोबाचा संचार झाला (वारे आले) आणि ते घुमू लागले (नाचत चेष्टा करू लागले). मग लोक त्यांना प्रश्न विचारू लागले. एकाने प्रश्न केला, ''कोणत्या भाग्यवंताचे हे पोर बरे? येथपर्यंत (इथवर) कोठून कसे आले? देवा खंडोबा, तू तरी याचा शोध कर.'' देवाने उत्तर दिले, ''जा, कुदळी (खणण्याचे एक हत्यार) आणा. मी दाखवितो ती जागा खणा (उकरा). त्या पोराचा ठिकाणा (पत्ता) लागेल.'' मग तेथेच त्या गावकुसाजवळ (गावाच्या भोवतालच्या कुसू, म्हणजे भिंतीजवळ) त्याच निंबवृक्षाच्या बुडाशी (तळी) कुदळीवर कुदळी मारताच तेथे विटा आढळल्या. विटांचा थर संपल्यावर आणि (त्याखाली दिसलेली) जात्याची तळी (जात्याच्या वाटोळ्या दोन दगडांपैकी एक) दूर सारल्यावर एक भुयार (तळघर) दृष्टीस पडले, ज्यात चार समया जळत होत्या. ते भुयार चुनेगच्ची (चुन्याचा लेप देऊन बांधलेले) होते व त्यात एक पाट आणि गोमुखी (गाईच्या तोंडासारखी जपमाळेची पिशवी, जिच्या आत हात घालून जपाची माळ घेऊन जप करतात) सह सुंदर जपमाळ होती. देव म्हणाले, ''या ठिकाणी या पोराने बारा वर्षे तप केले होते (आचरले).'' मग सर्व लोक आश्चर्याने पोराला खोदूखोदून विचारू लागले, तेव्हा त्या बारा मुलखाच्या गमती (विनोदी) पोराने भलतीच कथा सांगितली. तो म्हणाला, ''माझ्या गुरुचे हे स्थान आहे. माझे पवित्र

वतन (बक्षिसाची जागा) आहे. तसेच याचे जतन (काळजीपूर्वक सांभाळ) करा. एवढे माझे सांगणे ऐका.'' बाबा असे बोलले आणि ऐकणाऱ्यांनी ऐकले. परंतु बाबा असे भलते (काहीतरी, वेडेवाकडे) बोलले, असे म्हणण्याला माझी जीभ का बरे वळली? माझे मलाच आश्चर्य वाटते. असा का माझा समज? परंतु आता मला कळले. बाबांचा हा सहज विनोदही असेल. मूळचीच बाबांना थट्टेची (विनोदाची) आवड. भूयार त्यांचेच आलय (वसतीचे स्थान) असेल देखील. परंतु आपल्या गुरुंचे म्हटले, तर त्यात कोणते मोठे (आपले) महत्त्व खर्च होईल? (काय वेचें) (असे बाबांना वाटत असेल) (ओ. १२४-१३४)

असो. बाबांच्या आज्ञेवरून (गावलोकांनी) पूर्वीप्रमाणे विटा लावून (बाबांच्या) आपल्या गुरुंची जागा (निजगुरुस्थान) म्हणून ते भुयार बंद करून टाकले. जसा अश्वस्थ (पिंपळाचे झाड) किंवा औदुंबर (उंबराचे झाड), तसाच बाबांना हा निंबतरू (निंबाचा वृक्ष) श्रेष्ठ (वर) वाटत होता. त्यावर त्यांचे अति प्रेम होते व त्याचा ते फार आदर करीत असत. म्हाळसापती वगैरे शिरडीचे जुने गावकरीलोक बाबांच्या गुरुंचे हे समाधिस्थान म्हणून त्याला वंदन करतात. या समाधिस्थानाजवळ बाबांनी बारा वर्षे मौन धरून (न बोलता स्तब्ध बसून) तपश्चर्या केली, अशी वार्ता लोकांत प्रसिद्ध आहे. समाधी आणि निंबवृक्षासकट चारीबाजूंची (चौफेर) जागा विकत घेऊन बाबांचे (एक) भक्त साठेसाहेब (कै. रावबहादूर हरि विनायक साठे, प्रांताधिकारी, खेडा जिल्हा, गुजरात) यांनी तेथे चार ओटे असलेली (चौ+सोपी) इमारत उठविली. हीच इमारत, हाच वाडा (शिरडीला बाबांच्या दर्शनाला येणाऱ्या) यात्रेकरूंची अगदी सुरुवातीची (मूळ) राहण्याबसण्याची जागा (आखाडा) होती. त्या ठिकाणी आल्यागेल्यांचा एकच दाट चिखल (गाढा राडा) होत असे (अत्यंत गर्दी होत असे). साठ्यांनी निंबाला पार (झाडाच्या भोवताली घातलेला ओटा) बांधला. दक्षिण व उत्तर दिशांकडे वरचे मजले (माड्या) काढले आणि उत्तरेचा जिना तयार करताना (त्याखाली) हे भुयार दाखविले. जिन्याखाली दक्षिण दिशेकडे तोंड असलेला (दक्षिण+अभिमुख) एक सुंदर कोनाडा आहे. त्याच्या समोरच (निंबवृक्षाच्या) पारावर उत्तर दिशेकडे तोंड करून (उदङ्+मुख) भक्त बसतात. ''गुरुवारी आणि शुक्रवारी सूर्य मावळल्यावर (सूर्य+अस्ती) जो (या ठिकाणी) (शेणाने) सारवून वर क्षणभर जरी उद (सुगंधी धूप) जाळेल, त्याला श्रीहरी सुखी करेल.'' श्रोत्यांच्या मानत शंका येईल की, ही अतिशयोक्ती तर नसेल ना? किंवा हे कितपत खरे असेल? तरी मुळीच (अणुप्रमाण) शंका धरू नका. हे माझ्या पदरचे विधान (खरे आहे म्हणून सांगणे) नव्हे, कानांनी (श्रवणाद्वारे) ऐकलेले हे साईबाबांचे शब्द आहेत. ज्यांनी ते प्रत्यक्ष ऐकले, ते आज जिवंत (विद्यमान) सुद्धा आहेत की. (ओ. १३५-१४५)

पुढे झाला दीक्षितांचा (कै. हरि सीताराम दीक्षित, एल् एल्.बी., सॉलिसीटर, जे. पी., मुंबई) वाडा आणि भाडे देऊन राहणाऱ्यांची ऐसपैस (प्रशस्त) सोय झाली. मग थोड्या दिवसांतच पुढे तेथे (नागपुरचे मोठे धनिक कै. बापूसाहेब बुट्टींचा) दगडी वाडाही बांधला गेला (उठला). दीक्षितांच्या पुण्यकारक कृत्यांची प्रसिद्धी (पुण्यकीर्ती) आधीच होती. ते भावार्थाची (निष्कपट वृत्तीची किंवा श्रद्धेची) ओतीव (साच्यात घालून तयार केलेली) मूर्तीच होते. आंग्लभूमीच्या (इंग्लंडच्या) यात्रेला (प्रवासाला) गेले असताना तेथे (त्यांच्याकडून) आपले (आध्यात्मिक आकर्षणाचे) मूळ कारण पेरले गेले (रोविती निजबीज). येथे श्रोते शंका घेतील की, मथुरा, काशी, द्वारका इत्यादीं सारखी (भारतातील धार्मिक तीर्थे) सोडून धर्मबाह्य जी आंग्लभूमी (इंग्रज लोकांची जागा) ती परमार्थ कसे बरे साध्य करून देईल ? श्रोत्यांची ही शंका साहजिकच आहे. ती दूर झाली तर त्यांना कौतुकच वाटेल. थोडेसे (अल्प) विषयांतर होईल, परंतु सर्व (श्रोते) क्षमा करतील (अशी आशा करतो). काशी, प्रयाग, बद्रिकेदार, मथुरा, वृंदावन, द्वारकापूर इत्यादी अति पवित्र (पुण्यनिकर) यात्रा दीक्षितांच्या पदरी पूर्वीच होत्या; शिवाय वाडवडिलांची पुण्याई, सद्भाग्याची अपूर्वाई (उत्कृष्टपणा) आणि सर्व पूर्वार्जिताची (मागील जन्मात संपादिलेल्या पुण्याची) भरपाई म्हणून श्री साईबाबांचे दर्शन घडले. या दर्शनाचे मूळ (आदि) कारण म्हणजे प्रारब्धाने प्राप्त झालेला लंगडेपणा (प्राक्तनीचे पांगुळपण), जो इंग्रजांच्या देशात असताना पाय घसरून आला. वरून दिसायला जरी हा कुयोग (अशुभ योग) असला, तरी त्याचा परिणाम शेवटी (परिपाके) गुरुपुष्ययोग (गुरु ग्रह आणि पुष्य नक्षत्र यांचा आकाशात योग, म्हणजे एकत्र येणे फार शुभकारक मानले जाते) होण्यात झाला व त्यामुळे (दीक्षितांच्या) चांगल्या कर्मांना (सत्+उद्योग) फळ येऊन श्री साईंचा अलभ्य (मिळण्यास कठीण) संयोग (निकटचा संबंध) घडला. चांदोरकरांची गाठ पडली आणि साईंची कीर्ती कानी (कर्णी) पडली. ते म्हणाले, "(साईंच्या) दर्शनाचे नवल (नव्हाळी) पहा तर खरे! लंगडेपणा लगेच (तात्काळ) जाईल." परंतु पायाच्या ह्या लंगडेपणाला दीक्षित कमीपणा (उणेपणा) मानीत नव्हते. "माझा खरा लंगडेपणा मनाचा आहे, तो घालवा", असे ते साईबाबांना म्हणाले. "त्वचा (चामडी), रुधिर (रक्त), मांस व हाडे यांचा समुदाय (जमाव) म्हणजे माणसांच्या देहाचा सांगाडा (खोका) आहे आणि संसारगाडा (प्रपंचातील खटाटोप किंवा व्यवहार) क्षणभंगूर (क्षणात नाश पावणारा) आहे. पाय लंगडा राहिला, तर काय बिघडेल? (ओ. १४६-१५६)

सन एकोणीसशे नऊ, महिना नोव्हेंबर, तारीख दोन या दिवशी दीक्षितांना साईबाबांचे पुण्यपावन दर्शन प्रथम घडले. मग पुढे ते त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात जेव्हा शिरडीला श्रींचे पुन्हा दर्शन घेण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना तेथेच राहण्याची

इच्छा झाली. आधी त्यांना विचार आला की, (आपले) पंचवीस शेअर (कंपनीचे भाग, ज्यावर दरवर्षी कंपनीच्या नफ्याचा हिस्सा भागधाराला मिळतो.) काढून विकावे व पत्र्याचे एक छप्पर बांधावे, म्हणजे यात्रेकरूंची सोय होईल. परंतु नंतर पुढे वाडाच (मोठी इमारतच) बांधावा, असा मनाचा निश्चय (धडा) झाला आणि पुढच्या वर्षी पायाचा (घराची बांधणी करण्यापूर्वी त्याच्या खालची जमीन भक्कम करून केलेला बंदोबस्त) दगड बसवून (निक्षेप) कामाची सुरुवात (मुहूर्तमेढ) केली. नऊ डिसेंबरचा तो दिवस. बाबांची संमती (अनुमोदन) घेतली आणि तोच शुभमुहूर्त मानून पाया बांधणे उरकून घेतले. बोलावूनही न येणारे दीक्षितांचे बंधुही (नागपुरचे राजाराम उर्फ भाईजी. पहा अ. ४९, ओ. ७९) त्यादिवशी त्याच शुभ वेळी आधीच आलेले होते. श्रीयुत् दादासाहेब खापर्डे (अमरावतीचे प्रसिद्ध वकील व त्याकाळचे लेजिस्लेटिव असेंब्लीचे मेंबर) सुद्धा पूर्वीच सडे (एकटे, कुटुंबाशिवाय) आलेले होते. घरी परत जाण्यासाठी बाबांची आज्ञा मागताना त्यांना किती अडचणी (सांकडे) आल्या होत्या? परंतु खापडर्यांना घरी जाण्यासाठी आणि दीक्षितांना पाया घालण्यासाठी आज्ञा दोघांनाही दहा डिसेंबर रोजीच झाल्या. आणखी या दिवसाचे महत्त्व (महती) म्हणजे, बाबांची (एका दिवसाआडची) चावडीची शेजारती (रात्री निजावयास जाण्यापूर्वी करावयाची देवाची आरती); ती देखील याच दिवसापासून करण्यास सुरुवात झाली. (अध्याय ३७, ओवी ११८ मध्ये हीच तारीख; परंतु वर्ष वेगळे म्हणजे सन १९०९ दिलेले आहे.) पुढे १९११ मध्ये रामनवमीचा चांगला मुहूर्त साधून गृहप्रवेशाचे कार्य (संस्कार) विधीपूर्वक उरकून घेतले. (हा दीक्षितवाडा म्हणजे, गुरुस्थानला लागून समाधी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पलीकडे उत्तरेला असलेली सध्याची जुनी इमारत. त्यावर 'दीक्षित-वाडा' ही नामशिला अजून आहे.) (ओ. १५६-१६६)

पुढे श्रीमंत बुट्टींचा वाडा (इमला) अलोट पैसा खर्च करून झाला आणि त्यात बाबांचा देह विश्रांतीला येऊन (त्याचे समाधी-मंदिर होऊन) पैसाही सार्थकी लागला. जेथे पूर्वी एकही वाडा नव्हता, तेथे आता तीन झाले. परंतु सुरुवातीला साठ्यांच्या वाड्याचा उपयोग (उपयुक्तता) सर्वांना फारच झाला. (हा वाडा पुढे २० सप्टेंबर १९२४ रोजी मुंबईचे वकील कै. आर. एस. नवलकर यांनी विकत घेतला आणि नंतर त्यांच्या वारसांनी तो सन १९३९ मध्ये संस्थानला अर्पण केला. येथेच सध्या संस्थानचे मुख्य कार्यालय आहे. गुरुस्थानही याच जागी आहे. वरचे दोन मजले संस्थानने मागाहून बांधले.) या वाड्याचे आणखी एक महत्त्व म्हणजे, याच ठिकाणावर पूर्वी बाबांनी आपल्या हातांनी लावलेली (निर्मिलेली निजहस्ते) फुलझाडांची बाग होती. या बागेची लहानशी कथा पुढील अध्यायात सांगितली जाईल. हा हेमाडपंत श्रोत्यांसह साईंच्या चरणी मस्तक ठेवत आहे. वामन तात्या (मातीची भांडी बनविणारा

कुंभार) घडे पुरवीत होता आणि साई समर्थ पाणी शिंपून त्या उखर जागी (नापीक, खडकाळ व रेताळ जमिनीवर) बाग उठवीत होते. नंतर ते गुप्त झाले. परंतु काही दिवसांनी औरंगाबादेजवळ चांद पाटलाशी भेट होऊन त्याच्याकडच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर शिरडीला पुन्हा परतून (मागुते) आले. पुढे देवीदासाची भेट झाली, जानकीदासाची गाठ पडली, गंगागीराशी दृष्टादृष्ट झाली (एकमेकांवर नजर पडली) आणि हे त्रिकूट (तिघेजण) शिरडीत एकत्र जमले. मोहिद्दीनबरोबर कुस्ती झाली, मशिदीत वस्ती झाली, डेंगळ्यांबरोबर (निमगांवच्या कै. बाबासाहेब डेंगळ्यांबरोबर) प्रेम जडले आणि भोवती भक्त भेटले. या सर्व गोष्टींचे वर्णन पुढच्या अध्यायात ऐकले जाईल. आता हेमाडपंत श्री साईंना शरण जाऊन अनन्यपणे त्यांना लोटांगण घालतात (साष्टांग नमस्कार करतात). (ओ. १६७-१७५)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंतांनी रचलेल्या "साईसमर्थ-अवतरण" (समर्थ साईंचे पृथ्वीवर मनुष्यरूपाने जन्मास येणे) नावाचा चौथा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरू साईनाथांना नमस्कार असो. सर्व मंगल असो.**

**(या अध्यायावरील अधिक टीका पुढीलप्रमाणे)**

## अध्याय ४ ची आणखी टीका

(या अध्यायात ओ. १११ मध्ये म्हटल्याप्रमाणे श्री साईनाथ "**तरूण सोळा वर्षांचे वयांत। निंबातळीं शिरडी गावांत। प्रथम भक्तार्थ प्रकटले।।**" तेव्हापासून आजपर्यंत अनेक भक्तांनी, अनेक विद्वानांनी बाबांचा जन्म कोठे झाला, कोणत्या जातीत व कुळात झाला आणि त्यांचे आईबाप कोण होते, हे जाणण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु अजूनही कोणालाच याबद्दल पुराव्यासकट निश्चित माहिती मिळालेली नाही. बाबा हयात असताना त्यांच्या सान्निध्यातील अनेक भक्तांनी त्यांना याबाबतीत विचारून पाहिले होते, परंतु बाबांनी दाद लागू दिली नव्हती; उलट प्रत्येक प्रसंगी काहीतरी अघटित लीला दाखवून त्यांना गप्प बसावयास लावले होते. हिंदूंना ते हिंदूंसारखे दिसत, तर मुसलमानांना ते मुसलमानांसारखे वाटत असत. बाबांच्या समाधीनंतर अनेक चांगल्या सुशिक्षित थोर व्यक्तींनी या गूढ प्रश्नाचा शोध करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, परंतु त्यांनाही काही विशेष यश लाभले नाही.

**कै. काकासाहेब दिक्षित** हेमाडपंतांच्या (कै. गो. र. दाभोलकरांच्या) श्री साईसच्चरितासाठी लिहिलेल्या उपोद्घातात म्हणतात:-

"महाराज मूळ कोठील राहणारे व त्यांची मातापितरे कोण, याविषयी खात्रीलायक माहिती मिळत नाही. एवढे मात्र खचित दिसते की, महाराजांचा मोंगलाईशी (म्हणजे त्याकाळच्या निजाम सरकारच्या हैद्राबाद संस्थानच्या प्रदेशाशी) संबंध बराच असावा. महाराजांच्या बोलण्यात शेलू, जालना, माणवद, पाथरी, परभणी, नौरंगाबाद (म्हणजे औरंगाबाद), बीड, बेदर या मोंगलाईच्या गावांचा वारंवार उल्लेख येत असे. एकदा एक पाथरीचा गृहस्थ महाराजांच्या दर्शनास आला होता. त्याला महाराजांनी पाथरीची हकीकत विचारून तेथील बहुतेक ठळक ठळक गृहस्थांची नावे घेऊन त्यांच्याविषयी चौकशी केली. यावरून महाराजांना पाथरीची विशेष माहिती होती, असे मानता येईल; पण त्यांचा जन्म तेथलाच असावा, असे खात्रीलायक म्हणता येत नाही."

तसेच **कै. म्हाळसापती,** जे बाबांच्या सान्निध्यात चांदभाई पाटलांच्या वरातीबरोबरच्या बाबांच्या आगमनापासून ते थेट त्यांच्या निर्वाणापर्यंत सतत ६० वर्षे राहिले, नव्हे कित्येक वर्षे मशिदीत बरोबर झोपलेही, त्यांना एकदा बाबांनी सांगितले होते, "माझा ब्राह्मण कुळात जन्म झाला आहे. मी प्रथम पाथरीला राहत होतो. नंतर माझ्या आईने मला एका फकिराच्या स्वाधीन केले."

धुळे येथील कोर्टाने बाबांची एका खटल्यासाठी जबानी घेतली असताना बाबांनी आपल्या गुरुचे नाव 'वेंकुशा' आणि धर्म 'कबीर' सांगितला होता. (C & S 581)

वरील व आणखी काही विधानांवरून काही भक्तांनी सध्याच्या मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील पाथरी गावी जाऊन माहिती गोळा करून काही तर्क बांधले आहेत :-

(१) **ह. भ. प. दासगणू महाराज** (कै. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे) यांनी बाबांच्या समाधीनंतर इ.स. १९२५ साली प्रसिद्ध केलेल्या 'भक्तिसारामृत'च्या अ. २६, ५२ व ५३ मध्ये बाबांच्या जन्माचा इतिहास असा सांगितला आहे :-

"साईबाबांचा जन्म परभणी जिल्ह्यातील मानवत जवळ पाथरी गावी ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या आईबापांनी त्यांना लहानपणीच एका फकिराच्या स्वाधीन केले होते. त्या फकिराने देह सोडताना आज्ञा दिल्याप्रमाणे त्याच्या बायकोने सेलू येथील गोपाळराव देशमुख नावाच्या धार्मिक जमीनदाराकडे त्याला नेऊन पोहोचविले. हे देशमुख परमार्थातील मोठे अधिकारी पुरुष होते आणि तिरूपतीच्या श्री व्यंकटेशाचे महाउपासक होते. त्यांच्या नीतीच्या कल्पना इतक्या उच्च होत्या की, त्यांची नजर एकदा स्नान करीत असलेल्या एका तरूणीच्या नग्न शरीरावर काही क्षण खिळली

म्हणून त्यांनी आपले दोन्ही डोळेच फोडून घेतले होते. ते एकदा काशीयात्रेला गेले असताना वाटेत अहमदाबाद येथील मुबागशहाच्या दर्ग्यात गेले होते. ते दर्ग्याजवळ जाताच कबरीला घाम सुटला व आतून आवाज निघाला, '' हे पूर्वजन्मीच्या रामानंदा! मोंगलाईत देशमुख झालात, तरी मी तुम्हाला ओळखले. शेलुहून पाच कोसांवर मानवत नावाचे गाव आहे, तेथे तुमचा शिष्य कबीर एका फकिराच्या पोटी जन्माला येईल.'' गोपाळराव सेलूला परत आल्यावर मानवतहून त्या फकीराची बायको लहान साईबाबांना घेऊन आली आणि गोपाळरावांनी त्याला पूर्वजन्मीचा आपला शिष्य 'कबीर' म्हणून ओळखले. पुढे हिंदू गुरु आणि मुसलमान शिष्य यांचे उत्कट प्रेम पाहून काही लोकांना मत्सर उत्पन्न झाला व त्यांनी या पोराला मारावयाचे ठरविले. एके दिवशी तो पोर गोपाळरावांच्या पुढ्यात झोपला असताना त्या लोकांनी त्याला एक दगड फेकून मारला, पण तो चुकून गोपाळरावांना लागला आणि त्यांच्या डोक्याला खोंच पडली. गोपाळरावांना कळून चुकले की, आपला अंत समय आता जवळ आला आहे. म्हणून त्यांनी आपल्या सर्व दैवी सिद्धी त्या बालसाईला देऊन टाकल्या आणि पश्चिमेला गोदावरी नदीच्या दक्षिण तीराकडे निघून जाण्यास सांगितले. गोपाळरावांनी पुढे लगेच आपला देह सोडला आणि हे बालसाई फिरत फिरत एके दिवशी शिरडीत येऊन पोहोचले आणि निंब वृक्षाखाली प्रकट झाले.''

(२) **मद्रासचे प. पू. नरसिंहस्वामी**, ज्यांनी इ.स. १९३५ सालानंतर शिरडीला आल्यावर साईबाबांना पाहिलेल्या ८० च्यावर भक्तांची निवदने घेऊन पाच खंडाचे विस्तृत इंग्रजी भाषेत श्री साईबाबांचे चरित्र प्रसिद्ध केले, त्यांना दासगणू महाराजांचा वर कथन केलेला बाबांचा जन्मोतिहास मान्य होता व तोच त्यांनी आपल्या पहिल्या खंडातील पृ. १२ ते १८ वर उद्धृत केला आहे.

(३) हल्ली श्री साईबाबांचे अवतार म्हणून म्हटले जाणारे आंध्रप्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील पुट्टपारथी निवासी **श्री सत्यसाईबाबा** यांनी आपल्या पूर्व अवताराचा (म्हणजे साईबाबांचा) जन्मोतिहास सांगितला, तोही थोड्याफार फरकाने काही असाच आहे:-

''दक्षिण भारतात गोदावरीच्या काठी पाथरी गावी एक गंगाभव नावाचा वैदिक ब्राह्मण आणि त्याची धर्मपत्नी देवगिराम्मा राहत असत. त्यांचे गोत्र भारद्वाज होते. ते दोघेही पवित्र, उदार, धार्मिक वृत्तीचे व शंकरपार्वतीचे अनन्य उपासक होते. परंतु संतती नसल्यामुळे उदास होते. भगवान शंकरांनी अतिथीरूपाने येऊन त्यांची अनेक वेळा परीक्षा घेतली व ते दोघेजण त्यांच्या कसोटीस उतरले. भगवान शंकर व पार्वती यांनी प्रकट होऊन त्यांना वरदान दिले आणि त्याच्या प्रभावाने भगवान शंकरांनी

त्यांच्या पोटी तिसऱ्या पुत्राच्या रूपाने जन्म घेतला. तो पुत्र म्हणजेच शिरडीचे साईबाबा होत. दरम्यान गंगाभाव इतके विरक्त झाले की, त्यांनी गृहत्याग करण्याचे ठरविले. देवगिराम्माने पण पतीबरोबर जाण्याचा हट्ट घेतला. शेवटी त्या साईबालकाला एका झाडाखाली सोडून ते दोघेजण तपश्चर्या करण्यासाठी वनात निघून गेले. थोड्या वेळाने एक निपुत्रिक फकीर व त्याची बायको त्या बाजूने जात असता त्यांची नजर त्या बालकावर पडली. त्यांनी त्या बालकाचा ईश्वरी प्रसाद म्हणून स्वीकार केला व त्याचे १२ वर्षे पालनपोषण केले. पुढे तेथील एका जमीनदाराच्या मुलाबरोबर झालेल्या सामन्यात साईबाबांनी एक शिवलिंग जिंकले व त्याबरोबर ते खेळतात, ह्या सबबीवर स्थानिक मुसलमानांनी साईबाबांना घालवून देण्यास त्या फकिराला भाग पाडले. त्यानंतर गोदेच्या तीरावर भटकत असता साईबाबा औरंगाबादेस येऊन पोहोचले व तेथे धूपखेड्याच्या चांद पाटलाशी भेट होऊन त्यांचेबरोबर ते शिरडीस आले."

(४) अगदी अलिकडे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. बाळासाहेब खेर यांचे चिरंजीव **श्री. वि. बा. खेर** यांनी आपल्या पत्नीसह पाथरी गावाला भेट देऊन तेथील लोकांशी झालेल्या संभाषणात जे धागेदोरे सापडले व त्याचा पाठपुरावा केल्यावर जो पुरावा मिळाला, तो त्यांनी श्री साईलीलाच्या एप्रिल १९७६ च्या अंकात 'श्री साईबाबांच्या जन्मस्थानाचा शोध' या लेखात प्रसिद्ध केला आहे. यात ते म्हणतात की, पाथरी हीच साईबाबांची जन्मभूमी असली पाहिजे व तेथील देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मणाच्या भुसारी कुटुंबात त्यांचा जन्म झाला असावा.

परंतु साईबाबांचे बरेच भक्त त्यांना ईश्वराचे अवतार समजून 'अयोनिज (स्त्रीच्या गर्भातून ऊत्पन्न न झालेले)' मानतात :-

(१) श्री साईसच्चरितकार **श्री. गो. र. दाभोलकर (हेमाडपंत)** म्हणतात :-

**''कोणी म्हणोत भगवद्भक्त। कोणी म्हणोत महाभागवत।**
**परी आम्हांसी ते साक्षात भगवंत। मूर्तिमंत वाटले।।अ. ११, ओ. २५।।**

**जैसे गोणाईस भीमरथींत। तमालास भागीरथींत।**
**नामा कबीर शिंपल्या आंत। सुदैवे प्राप्त झाले।।अ. ४, ओ. ११०।।**
**तैसेचि हे श्रीसाईनाथ। तरूण सोळा वर्षांचे वयांत।**
**निंबातळी शिरडी गावांत। प्रथम भक्तार्थ प्रकटले।।१११।।**

**साई अविनाश पुरातन। नाहीं हिन्दु वा यवन।**
**जातपात कुळ गोतहीन। स्वरूप जाण निजबोध।।अ. ५, ओ. २४।।**

(२) भक्तश्रेष्ठ **कै. काकासाहेब दीक्षित** हेमाडपंतांच्या श्री साईसच्चरिताच्या उपोद्घातात आणखी पुढे म्हणतात :-

''महाराजांना '**अयोनिज**' मानणे हे भक्तेतरांच्या दृष्टीने अशक्य वाटेल, पण तसे प्रस्तुत लेखकाला वाटत नाही. या लेखकाजवळ महाराजांनी स्वत: एकदा असे उद्गार काढले होते की ''आता आपण जाऊ ते आठ वर्षांचे होऊन येऊ''. श्रीकृष्णमूर्ती देवकीमातेजवळ प्रकटली तेव्हा आठ वर्षांचीच होती, असे पुराणांतरी वर्णन आहे. '**आठा वर्षांची मूर्ती। असंभाव्य पडिली दीप्ति। तेजें दशदिशा उजळती। तेथें लपती शशिसूर्य।।' (हरिविजय अ. ३, ओ. १२६)** महाराजांचे पुष्कळ भक्त त्यांना साधकाचे सिद्ध झालेले मानत नसून प्रत्यक्ष अवतार मानतात व महाराजांच्या लीला व त्यांची अद्भुत शक्ती पाहून त्यांना श्रीकृष्णाचा अवतार मानणारे पुष्कळ आहेत.''

(३) साकोरीच्या **प. पू. उपासनी महाराजांनी** त्यांच्या साईनाथ महिम्न स्तोत्रात, जे शिरडीत आरतीच्यावेळी रोज म्हटले जाते, साईबाबांचे साक्षात् ईश्वर म्हणूनच वर्णन केले आहे :-

**सदा सत्स्वरूपं चिदानंदकंदं। जगत्सभव स्थान संहार हेतुम्।**
**स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयंतं। नमामि ईश्वरं सद्गुरुं साईनाथं।।१।।**

(सदा आपल्या खऱ्या, म्हणजे ब्रह्म स्वरूपात स्थित असलेल्या, चैतन्य व आनंद यांचे मूळ असलेल्या, जगाच्या उत्पत्ती, आधार व संहार यांचे कारण असलेल्या आणि आपल्या भक्तांच्या इच्छेखातर मनुष्यरूपाने प्रकट झालेल्या, साक्षात् ईश्वरच असलेल्या सद्गुरु साईनाथांना मी नमस्कार करतो.)

अजन्माद्यमेकं परब्रह्म साक्षात्। स्वयं संभवं राममेवावतीर्णम्।
भवद्दर्शनात्संपुनीत: प्रभोऽहं। नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथम्।।८।।

(जन्म न घेतलेल्या, सर्वांच्या आधी असलेल्या, एकटाच कोणी बरोबरी नसलेल्या, साक्षात् परब्रह्म असलेल्या, स्वत:च उत्पन्न झालेल्या आणि अवतार घेतलेले श्री रामचंद्र प्रभूच असलेल्या सद्गुरु साईनाथांना मी नमस्कार करतो. हे ईश्वरा साईनाथा! तुमच्या दर्शनाने मी अत्यंत पवित्र झालो आहे.)

(४) **ह. भ. प. दासगणू महाराजांनी** बाबांच्या समाधीनंतर तपास करून वर सांगितलेली बाबांच्या जन्माची व त्यांच्या गुरुबद्दलची कथा त्यांच्या भक्तिसारामृतात वर्णिली असली, तरी बाबा हयात असताना रचलेल्या श्री साईनाथ स्तवनमंजरीत ते बाबांची वारंवार जन्मरहित, जातगोतरहित भगवंत म्हणूनच स्तुती करतात :-

जगाचे जे आद्य कारण। जे कां विमल चैतन्य।
ते तुम्हीच आहा दयाघन। विश्व हा विलास तुमचाचि ।।१७।।
आपण जन्मरहित। मृत्यूही ना आपणांप्रत।
तेंच अखेर कळून येत। पूर्ण विचारें शोधितां ।।१८।।

आपली आहे ब्राह्मस्थिती। जात गोत ना आपणाप्रती।
आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती। आहा आद्य कारण ।।७०।।

(५) कै. **स्वामी शरणानंदजी** (वामनभाई पटेल) जे अलिकडेच, म्हणजे १९८२ साली वयाच्या ९३ व्या वर्षी साईचरणी लीन झाले, जे १९११ ते १९१४ दरम्यान कित्येक दिवस शिरडीत येऊन बाबांजवळ राहिले होते व ज्यांच्या पवित्र हस्ते १९५४ साली शिरडीच्या समाधिमंदिरातील भव्य व सुंदर मूर्तीची स्थापना झालेली आहे, ते आपल्या 'श्री साईबाबा' या गुजराती पुस्तकात म्हणतात :-

''बाबांनी एका अनन्य रामभक्ताला रामाचे दर्शन घडविले, तसेच दुसऱ्याला श्रीकृष्णाचे, तिसऱ्याला हनुमानाचे, चौथ्यास शंकराचे, पाचव्यास गणपतीचे, सहाव्यास संन्यासी गुरु घोलपांचे, सातव्यास दत्तगुरुंचे व आठव्यास त्याच्या उपास्य अक्कलकोट स्वामींचे अशा अनेक रूपांत दर्शन दिले. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, प्रत्येकास आपल्या इष्ट देवतेचे दर्शन घडवून आपल्या पूर्णावस्थेची प्रचिती दिली. ....जो पूर्ण परब्रह्माबरोबर तादात्म्य पावलेला असेल, तोच अनन्य भक्तांना त्यांच्या उपास्य अथवा इष्ट देवतांची प्रचिती आणून देऊ शकतो. पूर्णावतार श्रीकृष्णच मारुतीसारख्या अनन्य भक्ताला त्याच्या उपास्य दैवत रामरूपाने दर्शन देऊ शकला.''

असो. या सर्व विवेचनावरून साईबाबांच्या जन्माविषयी दोन मुख्य मते दिसतात. पहिल्या पाथरी येथे जन्म झालेल्या प्रणालीचा विचार केला, तर हे सर्व तर्कवितर्क आहेत. शंभर टक्के पुरावे कुणालाच नाहीत. दुसऱ्या 'अयोनिज' किंवा साक्षात् ईश्वराचा अवतार या प्रणालीचा विचार केला, तर ती बाबांची दैवीशक्ती व चमत्कार अनुभवलेल्या त्यांच्या भक्तांच्या नितान्त श्रद्धेवर आधारलेली आहे. परंतु माझ्या मते, एक गोष्ट आपण ध्यानात घेतली पाहिजे की स्वत: बाबांनाच आपला जन्म हिन्दू कुटुंबात झाला, की मुसलमान कुटुंबात झाला, हे कोणाला कळू द्यावयाचे नव्हते. मग त्यांच्या हिन्दु-मुस्लिम ऐक्याच्या कार्यात व्यत्यय आला असता. कुणाकुणा हिन्दू भक्तांना बाबांनी आपला जन्म हिन्दू कुटुंबात झाला होता, असे म्हटले होते, हे खरे. परंतु मला वाटते ते त्या भक्तांच्या श्रद्धेला तडा जाऊ नये, म्हणून असावे. कारण बाबांनी आपण जन्माने हिन्दू ब्राह्मण असल्याचे मुसलमान भक्तांना सांगितलेले दिसत नाही. दुसरे म्हणजे हिन्दू व मुसलमान धर्माच्या शारीरिक उघड खुणाही त्याकाळी

जिवंत असलेल्या बाबांच्या निकटवर्ती भक्तांना ठामपणे पाहता आल्या नाहीत. कदाचित बाबांची ती माया असेल. कान टोचण्याबद्दल घ्या. दासगणू त्यांच्या स्तवनमंजरीच्या ६७ व्या ओवीत ''विंधावांचून असती कान', असे म्हणतात, तर हेमाडपंत श्री साईसच्चरिताच्या ७व्या अध्यायातील ओ. १३ मध्ये 'विंधित कान', असे म्हणतात. निर्वाणाच्या आधी दोन वर्षे दसऱ्याच्या शिलंगणाच्या वेळी बाबांनी एकाकी जमदग्नीरूप प्रकट केले, कफनी वगैरे धुनीत टाकून भडका केला व स्वतः दिगंबर होऊन म्हणाले, ''करा रे आता निदान। मी मुसलमान की हिंदू।'', तरी तेजाने डोळे दिपल्याने कोणालाही बाबांची सुंता झालेली होती की नाही, हे नीट पाहता आलेले दिसत नाही. बरेचसे भक्त बाबांची सुंता झाली नव्हती, असे प्रतिपादन करतात, तर हेमाडपंत श्री साईसच्चरिताच्या अ. ७ मधील ओ. १३ मध्ये 'हिन्दु म्हणता सुंता प्रमाण' (हिन्दू म्हणावे तर सुंतेचा खात्रीचा पुरावा आहे), असे म्हणतात. तात्पर्य म्हणजे, बाबांनी स्वतःच कधी गूढ शब्दांनी, कधी विनोद करून, तर कधी मोहात पाडून भक्तांना आपल्या जन्माबद्दल किंवा जातीबद्दल निश्चितपणे मुद्दामच कळू दिले नाही. तशी त्यांची इच्छाच नव्हती. मग आतासुद्धा आपण त्या खटपटीत व्यर्थ का पडावे? दासगणू म्हणतात:

> **परी भेद हे व्यावहारिक। यांते चाहतील तार्किक।**
> **परी जिज्ञासू भाविक। त्यां न वाटे महत्त्व यांचे।।६९।।**

झाड किती मोठे आहे, कोणी लावले आहे, त्याच्यावर फळे किती आहेत, या गोष्टींचा तपास न करता त्यावरील गोड फळे आपणाला खायला कशी मिळतील, हेच आपण पाहत असतो, नाही का? मग साधुसंतांच्याच बाबतीत त्यांची जात, धर्म, कुळ वगैरे शोधण्याचा आपण का बरे प्रयत्न करत असतो?

म्हणून शेवटी मला म्हणावेसे वाटते की वरील सर्व व्यर्थ प्रपंच सोडून बाबांचे चरित्र व लीला ऐकून, त्यांच्या शिकवणीप्रमाणे वर्तन ठेवून, त्यांची सतत भक्ती करून त्यांच्या कृपेने आपला उद्धार करून घेणे, हेच जास्त श्रेयस्कर आहे. भक्त कबीर म्हणतात:

> **जाति न गुरु का पुछिए, पूछ लिजिए ज्ञान।**
> **मोल करो तलवारका; पडा रहन दो म्यान।।)**

बालसाईभक्तांसाठी - वैखरीताई

# श्रद्धा आणि सबुरी

बालसाईभक्तांनो, तुम्ही बाबांच्या उपदेशातून श्रद्धा व सबुरी ही दोन अत्यंत प्रिय व मोलाची तत्त्वे ऐकली असतील, याची मला खात्री आहे. या शब्दाचा अर्थ प्रेम व तितीक्षा, विश्वास व सहनशक्ती, निष्ठा व सोशिकता, असा आहे. या दोन ढालींच्या संरक्षणाखाली जीवनाची वाटचाल करा, असे श्री बाबा भक्तांना सांगत. या श्रद्धा-सबुरीच्या प्रभावी शस्त्रामुळे विपत्ती बारा वाटा दूर पळतात व आशेचा, यशाचा प्रकाश पसरतो, असे ते म्हणत. श्रद्धा ही गुरुपदी निष्ठा आहे, तर सबुरी हा पुरुषाचा पुरुषार्थ आहे, असे बाबा सांगत. बाबांचे गुरु व्यंकुशा यांनी त्यांच्याकडे श्रद्धा व सबुरी हे दोन पैसे दक्षिणा म्हणून मागितली. बाबांनी ही गुरुदक्षिणा दिल्यावर श्री गुरुंनी त्यांच्यावर तात्काळ कृपा केली. हे दोन पैसे नेहमीचे धातूचे गोलक नव्हते. ते चारित्र्यबांधणीसाठी जरूर असलेले दोन सद्गुण होते. ती दोन फारच पृथ्वीमोलाची तत्त्वे होती. या दोन पैश्यांचा खरा अर्थ संपूर्ण निष्ठा व शरणांगती, असा होतो. सबुरीचा अर्थ जीवनातील सुख-दुःखाचे कसोटीक्षण धैर्याने व भक्तीने जगण्याचा संदेश होय !

आता श्रद्धा-सबुरीबाबत जरा सखोल चिंतन करू या:-

**श्रद्धा (निष्ठा)** :- गुरु वा देवावरील संपूण निष्ठा व विश्वास हा श्रद्धेचा अर्थ आहे. श्रद्धेतून भक्तीची सुरुवात होते व श्रद्धायुक्त संपूर्ण समर्पणात भक्तीचा शेवट होतो. भक्तांनी गुरु व परमेश्वर यांवर पूर्ण निष्ठा ठेवावी व आपल्या कर्माचे फळ भक्तीयुक्त अंत:करणाने भगवंताच्या पदी समर्पित करावे, हा श्रद्धेचा अर्थ होतो. जगातील मोहक वस्तूंचे आकर्षण व आसक्ती यात न गुंतता व फळाची अपेक्षा न ठेवता भगवंताबद्दल प्रेमादर बाळगावा. श्रद्धेमध्ये विश्वास, निष्ठा, प्रेम, समर्पण व शरणांगती यांचा सुंदर मिलाफ सामावला आहे. श्रद्धा संपूर्ण विकसित झाल्यावर तिला पराभक्तीचे दैवी रूप येते.

**सबुरी (तितीक्षा)** :- पुरुषाचे हे पौरुष आहे, असे बाबा म्हणतात. याचा अर्थ संसारातील सुख-दुःखांना शांत मनाने, निर्लिप्तपणे सामोरे जाणे, तक्रार न करता धैर्याने ती सहन करणे, यात फार मोठे धाडस, शक्ती, सोशिकता व धैर्य यांची जरूरी आहे. त्यामुळे हा एक फार मोठा पुरुषार्थ ठरतो व मानवी जीवनाला तो समृद्ध करतो.

आयुष्यातील हार-जीत, छाया-प्रकाश, सुखे व दु:खे यांचा अनुभव देणारी प्रारब्धरूप शाळा आहे. या प्रारब्धाला धैर्याने सोसा. प्रभूवर विश्वास व श्रद्धा ठेवून आल्या प्रसंगाला विवेकाने, कर्तव्यबुद्धीने तोंड द्या. राग द्वेष निर्माण करून पुन्हा नव्या कर्मात वा प्रतिक्रियांत गुंतू नका, हा सबुरीचा संदेश आहे. मानवी जीवनाशी प्रारब्धाने असे अनेक कडू-गोड प्रसंग जोडले आहेत. त्यांचा अशा भूमिकेतून परामर्श घ्यावा.

प्रपंच, प्रारब्ध इत्यादी तात्त्विक शब्दांची कठीण भाषा आपण विसरून जीवनाकडे सरळ सरळ पाहू या. श्रद्धा व सबुरी ह्या दोन पादत्राणांच्या सहाय्याने आपल्याला आयुष्याची वाटचाल करायची आहे. या दोन जोडयांच्या संरक्षणाने प्रत्येक पाऊल टाकायचे आहे. त्यामुळे संकटे टळतील. दु:खे दूर राहतील. श्रद्धेमुळे परमेश्वराच्या व श्री गुरुंच्या कृपेचे छत्र आपल्या शिरावर संरक्षणात्मक पसरलेले असते. सबुरीमुळे धगधगत्या जीवनातील तप्त पदपथावरील तापलेली धूळ आपल्याला स्पर्श करू शकत नाही. जेव्हा ती स्पर्श करील, तेव्हा ती कृपेने थंड झालेली असेल.

बालसाईभक्तांनो, ही दोन अमूल्य तत्त्वे तुम्ही कधीही विसरू नका. त्याचा आपल्या दैनंदिन आयुष्यात वापर करा व स्वत:चा उद्धार साधा.

## बालमन-ईश्वराचं खरं रूप

बालसाईभक्तांनो, बाबा जेव्हा प्रथम शिरडीत दिसले, ते बालरूपातच. बालसाईभक्तांनो, परमेश्वराचे खरे रूप हे बालमनच असते. बाबांना लहान मुले खूपच आवडत. ते त्यांना पैसे, खाऊ देत. बाबा नेहमी म्हणत, परमेश्वर सगळीकडे भरलेला आहे. माणसाने आपले मन प्रसन्न व शुद्ध ठेवावे. बाबांनी स्वत: झाडे लावून एक बाग निर्माण केली होती. त्यांनी लिंब, झेंडू, जाई-जुई ही झाडे लावली. ते स्वत: त्यांना पाणी घालीत. वृक्षलागवडीचे महत्त्व त्यांनी कैक वर्षांपूर्वीच पटवून दिले होते.

त्यांचा उपदेश साधा, सरळ सोपा होता: दुसऱ्यांना त्रास देता कामा नये. कुणाला हडहड करू नये. सर्वांचा आदर करावा. भुकेलेल्यांना प्रथम भाकरी दयावी. तहानलेल्यांना पाणी द्यावे. बाबांचे प्राणीमात्रांवरही खूप प्रेम होते. ते स्वत: दुकानात जावून तेल, मीठ-मिरची आणत व स्वयंपाक करून सर्व लोकांना एकत्र बसवून भोजन करवीत. त्यांनी सहभोजनाची प्रथा सुरु केली, ती आजही शिर्डी येथे चालू आहे. ते रामाचे परमभक्त होते. त्यांना भजन, कीर्तन खूप आवडे.

साईबाबा नेहमी परमेश्वराचे नाव घेत. पांढरे कपडे घालीत. पाच घरी भिक्षा

मागत. ते गोरेपान होते. त्यांना पेरू फार आवडे. त्यांच्याजवळ श्यामसुंदर नावाचा घोडा होता. त्यांना सर्व गोष्टी आपोआप समजत. ते नेहमी म्हणत, घाबरू नका, देवावर श्रद्धा ठेवा. त्यांना विनोद करणे खूप आवडे. तसेच ते कधी कधी रागावतही ; पण तो राग त्यांचा अगदी वरवरचा असे. म्हणून बालसाईभक्तांनो, आपण बाबांच्या उपदेशानुसार वागलो पाहिजे. मग, आपापसातील तंटेबखेडे अजिबात राहणार नाहीत.

- **श्री. प्रमोद बी. रायसोनी**
उस्मानपुरा, औरंगाबाद.

## ''हा आज खांदा पाणी वाही। परी ही मूर्ती सामान्य नाहीं''




बालसाईभक्तांनो, पावसाळा, हिंवाळा व उन्हाळा वेळेवर यावा, हवामान सुरळीत असावे, म्हणजे थोडक्यात म्हणायचे झाले, तर निसर्गाचा समतोल कायम रहावा, असे निसर्गाच्या समतोलाचे फायदे काय व तोटे काय, हे जे ओळखतात, त्यांना सारखे वाटत असते. परंतु अज्ञानामुळे म्हणा किंवा पैशाच्या अतिरेकी लोभाने म्हणा किंवा पोटासाठी म्हणा, वृक्षतोड एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाली की, आज सगळ्यांचाच तो चिंतेचा विषय बनला आहे. सगळीकडे वृक्षलागवडीचे आवाहन सर्वांना करण्यात येत आहे. बालसाईभक्तांनो, हे आवाहन की नाही आपल्या

साईबाबांनी कित्येक वर्षांपूर्वी तसे स्वत: वागून केले होते. बाबांनी बाग फुलवली होती. त्या बागेला ते पाणी घालत असत. बाबांना एकदा पाणी घालत असताना पाहून पुणतांब्याचे गंगागीर नावाचे एक संत म्हणाले की, ज्या शिरडीला हे श्रेष्ठ रत्न मिळाले, ती शिरडी भाग्यशाली आहे (...**धन्य शिरडीचें भाग्य वरिष्ठ। जोडलें श्रेष्ठ हें रत्न।। हा आज खांदां पाणी वाही। परी ही मूर्ति सामान्य नाहीं। होतें या भूमीचे पुण्य कांहीं। तरीच ये ठायीं पातली।।**). शिरडीहून तीन कि.मी. अंतरावरील राहात्याला जेव्हा बाबा जात, तेव्हा तेथून ते झेंडू, जाई, जुईंची रोपटी घेऊन येत. ती रोपटी स्वच्छ करीत, स्वत: मोकळ्या जागेत जमीन उकरून लागवड करीत व नित्यनियमाने पाणी घालीत. वामन तात्या नावाचा एक भक्त बाबांना रोज मातीचे कच्चे दोन घडे देत असे. त्या घड्यांनी बाबा स्वत:च्या हातांनी पाणी शिंपत असत. ते स्वत:च विहिरीवर पाणी ओढत, खांद्यावरून वाहून नेत व संध्याकाळी निंबवृक्षाखाली घडे ठेवीत असत. ते घडे तापविलेले नसल्याने व कच्च्या मातीचे असल्याने तेथे ठेवल्यावर लागलीच तुटत असत. दुसऱ्या दिवशी सकाळी वामन तात्या पुन्हा त्यांना घडे देत. हा क्रम जवळ जवळ तीन वर्षे चालू होता. बाबांच्या ह्या कठोर परिश्रमामुळे त्या उघड्या जागेवर सुंदर बाग फुलवली गेली. आज त्या जागेवर बाबांच्या समाधी-मंदिराची भव्य इमारत शिरडीची शोभा अधिकच वाढवित आहे.

**- तुमचा बालसाईभक्त सर्वांगडी**

---

शब्द शोध क्र. ५



आडवे शब्द :-

१) प्राचीन काळी युद्धाच्या सुरूवातीला रणभूमीवर एका विशिष्ट वस्तूचा आवाज केला जायचा, तो ध्वनी

३) सुखसमृद्धीसाठी ईश्वराचा सेवक

४) तीर

उभे शब्द :-

१) महेश


२) श्रीकृष्णाच्या अनेक नावांपैकी एक नाव

---

जावे संतांच्या गावा

# प.पू. स्वामी ब्रह्मानंद महाराज


- सौ. विभावरी ज. राणे
अंधेरी (पूर्व), मुंबई.



पृथ्वीतलावरील अनेक त्रासलेल्या, गांजलेल्या, कंटाळलेल्या मानवाला सन्मार्गाला लावण्यासाठी परमेश्वर संतांच्या रूपात जन्म घेतो. आपल्या देशात आजवर अनेक संतरत्ने होऊन गेली. ह्या सृष्टीची संगोपन करणारी स्वयंभू अशी शक्ती आहे, ती शक्ती म्हणजे ईश्वर.

महाराष्ट्राच्या पश्चिमेस निसर्गाने नटलेल्या कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळकोकणात मालवण हे शहर-तालुक्याचे ठिकाण आहे. महाराष्ट्राचे निर्माते शिवाजी महाराजांनी कोकणच्या ह्या सागरी किनाऱ्याचे संरक्षण व्हावे म्हणून मालवणच्या समुद्रात स्वतः लक्ष पुरवून बांधून घेतलेला सिंधुदुर्ग किल्ला आजही एखाद्या रक्षकासारखा कोकणचे रक्षण करीत उभा आहे.

मालवणपासून सहा किलोमीटरच्या अंतरावर उत्तरेच्या बाजूस ओझर हे निसर्गरम्य पवित्र ठिकाण आहे. हडी, रेवंडी, कांदळगाव ह्या त्रिवेणी संगमावर ओझर वसलेले आहे. ओझरची निसर्गरचना मनाला आल्हाद व आनंद देणारी आहे. या ठिकाणी अतिप्राचीन असे विशाल वृक्ष आहेत. ह्या वृक्षांच्या थंडगार



सावलीत, थोड्याशा खोल भागात श्री ओझरेश्वर या नावाचे स्वयंभू असे जागृत स्थान आहे.

वज्रेश्वरी येथील सुप्रसिद्ध शिवावतार श्री स्वामी नित्यानंद यांचे नाव सर्वांना परिचयाचे आहे. यांच्या दर्शनाला मूळगाव, कर्नाटक येथील स्वामी दर्शनाला आले. त्यांच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. कुमार वयात त्यांचे अभ्यासात फारसे लक्ष लागत नव्हते. एक दिवस अभ्यासासाठी त्यांना त्यांच्या शिक्षकाकडून मार खावा लागला आणि त्यामुळेच स्वामींनी शाळेचा अखेरचा निरोप घेतला.

"ॐ" ह्या एका अक्षराने ते कुमार वयातच भक्तिमार्गात ओढले गेले. "ॐ"च्या सतत अनुसंधानाने त्यांना खरीखुरी शांती मिळत होती. एके दिवशी "ॐ"च्या शोधात स्वामींनी आपल्या जन्मदात्या माता-पित्यांचा, नातेवाईकांचा, राहत्या घराचा आणि आपल्या जन्मगावाचाही त्याग करायचा निश्चय केला. परमेश्वराप्रत नेऊन सोडणारा, ब्रह्म जाणणारा व त्याची माहिती करून सांगणाऱ्या एखाद्या मार्गदर्शकाची – गुरुची त्यांना नितांत गरज होती, म्हणून अंत:प्रेरणेने प्रेरित

होऊन स्वामी नित्यानंदांच्या शोधात फिरत फिरत ते अल्पावधीतच त्यांच्यापाशी येऊन पोहोचले. गुरु-शिष्याची भेट झाली. मनोभावे गुरुची सेवा करून त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. नित्यानंदांच्या समवेत राहून ते ईश्वराची भक्ती करण्यात तल्लीन होऊन गेले. त्या जगत्कारण ईश्वरावर ''गतिर्भर्ता प्रभुः साक्षी, निवासः शरणं सुहृत्'' अशाप्रकारचा दृढ विश्वास, निर्भयता आणि ऐक्य यांची तर स्वामींच्या ठिकाणी पराकाष्ठा होऊन गेली होती. एवढेच नव्हे, तर ह्या गुणांच्या सहाय्याने त्यांनी ईश्वराशी अत्यंत प्रेमाचा संबंध जुळवून घेतला होता. बालकाचा ज्याप्रमाणे आपल्या मातेवर विश्वास असतो, तिजवर त्याचे जसे प्रेम असते, तशी स्थिती साधकाची झाल्यास, त्याला ईश्वर आपल्याजवळ असल्याचा सदैव अनुभव येतो.

स्वामी वज्रेश्वरीच्या देवालयात बसून, त्या अनंत भावमयी मातेला निरनिराळ्या रूपांत पाहण्यासाठी तासनूतास ते तिच्याजवळ अत्यंत व्याकूळ अंतःकरणाने धरणे धरून बसत असत. पूर्ण संतुष्ट झाल्यावर त्यांची भावसमाधी उतरे. त्यानंतर दुपारी आपल्या गुरुवर्यांसोबत बसून अल्पोपहार घेऊन त्यांची सेवा करीत असत. स्वामी नित्यानंदांची त्यांच्यावर अत्यंत माया होती. स्वामी नित्यानंद स्वामींची निस्सीम भक्ती पाहून त्यांच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी स्वामींना ''ब्रह्मानंद'' हे नाव धारण करण्यास सांगितले. त्यावेळेपासून स्वामींना त्यांचे भक्त ''ब्रह्मानंद महाराज'' म्हणून संबोधू लागले.

स्वामी नित्यानंदांनी त्यांना इच्छित ठिकाणी जाण्यास अनुमती दिली. वास्तविक स्वामींचे मन वज्रेश्वरीच्या वातावरणात जास्त रमले नाही. त्यांच्या अंतर्यामी एका वेगळ्याच तपोभूमीची ओढ लागली होती. अंतर्यामी ज्ञात अशी मालवण येथे ओझरची जागा स्वामींना भक्ती साधनेसाठी अनुकूल वाटत होती. त्यांच्या पदस्पर्शाने ''ओझर'' हे पवित्रक्षेत्र बनले. या ठिकाणी ते १९४१ मध्ये आले. ईश्वरभक्तीसाठी आणि आपल्या योगसाधनेसाठी हे स्वच्छ आणि थंडगार पाणवठ्याचे ठिकाण किती सुयोग्य आहे, हे स्वामींनी जाणले. घनदाट आमराईमुळे भरदुपारी देखील सूर्यदेवाची तप्तकिरणे जमिनीला स्पर्श करू शकत नाहीत. ओझरच्या गुहेमध्ये शंकराची पुरातनकाळी पूजेस ठेवलेली पिंडी पाहून स्वामी अतिशय आनंदित झाले. दिवसाही ह्या जागेत मनुष्य एकटा जाण्यास तयार होत नसे आणि हे स्वामी तर ह्या गुहेत रात्री-अपरात्री एकटे रहात असत.

रात्री जेव्हा सारे जग थकून-भागून शांतपणे झोपत असे, त्यावेळी स्वामी मात्र आपल्या समाधी अवस्थेत मग्न असत. परमेश्वराच्या नामस्मरणात ते स्वतःची तहान-भूक विसरून जात. जगात एका सद्‌गुरुवाचून दुसरे काही नाही, असे अनुभवले,

त्याला भय कोणाचे ? स्वामी ब्रह्मानंद खरोखरच जीवनमुक्त पुरुष होते. कित्येक वर्षांच्या दीर्घ तपश्चर्येने त्यांनी ही अवस्था प्राप्त करून घेतली होती. त्यांचे रोजचे व्यवहारही सर्वसाधारण माणसाप्रमाणे नसत. कधीकधी रात्रीच्या अंधारात थंडगार पाणवठ्याकाठी वाघ व अन्य हिंस्र श्वापदे यायची. अशावेळी उघड्या जागेत बसून समाधिस्थ होण्यासाठी योग्य सामर्थ्य अंगी असणे आवश्यक असते.

त्या जागेची नीट माहिती मिळविण्यासाठी स्वामींनी त्या जागी ध्यान लावले आणि अंतर्ज्ञानाने त्या स्थळाची व तेथील देवतांची माहिती करून घेतली. त्यानंतर एके दिवशी ओझरेश्वराने स्वामींना प्रत्यक्षात स्वत:चे दर्शन दिले. त्यांच्याच आशीर्वादाने स्वामींनी ओझरेश्वराची यथाविधी पूजा करून त्यांची तिथे (गुहेत) स्थापना केली.

कन्नड ही स्वामींची बोली भाषा, त्यामुळे ओझर येथील वास्तव्यात ते आलेल्या भक्तांशी हिंदीमधून बोलत असत. स्वामी स्वभावाने शांत होते. दर्शनासाठी या स्थळी गेल्यावर स्वामींच्या हस्ते त्यांच्या कमंडलूमधील तुळशीपत्रयुक्त सुगंधी–सुमधुर तीर्थामृत प्राशन करायला मिळे. असे सुगंधी तीर्थ प्राशन केल्याने कित्येकांच्या मनोव्याधी, विकार दूर झाले. स्वामींची किर्ती मालवण तालुक्यात सगळीकडे पसरली आणि स्वामी ब्रह्मानंदांचे ओझर ''ब्रह्मगिरी'' ह्या नावाने नावारूपास आले आहे.

कुडाळ (पिंगुळी) येथील प्रसिद्ध संत राऊळ महाराज यांच्या सान्निध्यात स्वामी ब्रह्मानंद काही दिवस राहिले. या ठिकाणी राहून एकमेकांच्या साहाय्याने या दोघांनी भक्तिमार्गातील योग्य अशी परिपूर्णता गाठली. काही दिवस कणकवली येथे येऊन, योगियांचे योगी स्वामी भालचंद्र महाराज यांच्या सान्निध्यात राहून काही काळ घालविला. भालचंद्र महाराज यांच्याविषयी स्वामींच्या मनात नितांत श्रद्धा होती. योगसाधनेमध्ये भालचंद्र महाराजांच्या तोडीचा अन्य महात्मा या युगात संपूर्ण पृथ्वीवर आढळणार नाही, असे ते नेहमी म्हणत असत. राऊळ महाराज तर आपल्या कित्येक भक्तांना स्वामी ब्रह्मानंदांच्या भेटीसाठी ब्रह्मगिरीला पाठवित असत. यावरून ह्या तिन्ही महान संतांचा आपापसातील जिव्हाळा, कोणत्या कोटीतील असावा, याची वाचकांना कल्पना येईल.

दरवर्षी स्वामी तीर्थाटनासाठी ओझरहून निघायचे. बरोबर लक्षात ठेऊन त्या त्या तीर्थस्थानाला साजरा होणारा महत्त्वाचा उत्सव आणि तो दिवस बघून त्या ठिकाणी उपस्थित राहायचे.

गोकर्ण, नरसोबाची वाडी, गाणगापूर, गोवा, गणेशपुरी ह्या ठिकाणी ते मुक्काम

करीत. वर्षातील तीन ते चार महिने वेगवेगळ्या तीर्थक्षेत्रांना भेटी देत असत.

वेंगुर्ले येथील प्रसिद्ध नारायण मंदिरात स्वामींचा मुक्काम असायचा. त्यावेळेस तेथील लोक त्यांना ओळखत नव्हते. त्यांची तिथे कोणी चौकशीही करीत नसे. स्वामी मात्र मंदिरात एका बाजूस स्वस्थ ध्यानमग्न होऊन भावसमाधीत तल्लीन होत. ह्या साऱ्या प्रकाराने तेथील काही प्रतिष्ठीत मंडळींनी एकत्र येऊन स्वामींची विचारपूस केली. दिवसेंदिवस तेथील भक्तांची संख्या वाढू लागली. स्वामींवरील अतूट श्रद्धेपोटी आजसुद्धा तेथील भक्तमंडळी वार्षिक उत्सव साजरे करून स्वामींच्या आठवणींना उजाळा देतात. वेंगुर्ले येथील मंदिरात स्वामी जात असले, तरी त्यांची ओढ ओझर येथेच असायची.

ओझरला एकदा अमावास्येच्या रात्री स्वामींच्या अंगाभोवती एका सर्पराजाने स्वतःस लपेटून घेऊन स्वामींच्या मस्तकावर आपल्या फणेचे छत्र पसरले होते. तिथल्या जागृत देवस्थानाचा मालक ओझरेश्वर अशाच स्वरूपात स्वामींच्या समाधीच्या संरक्षणाची स्वतःजवळ हमी घेऊन त्यांची समाधी पूर्णत्वाला येईपर्यंत त्यांचे संरक्षण करीत राहायचा. स्वामी समाधी अवस्थेमध्ये असताना त्यांच्यावरील उद्‌भवणाऱ्या संकटांना सामोरा जायला मी एकटा समर्थ आहे, याची हमी तो सर्पराज देत असे.

ब्रह्मानंद स्वामींनी भक्तीसाठी कधी प्रवचने केली नाहीत की भजने, अभंग गाईले नाहीत. फक्त ॐ काराच्या उच्चाराने दैवीसामर्थ्य प्रकट करून त्याद्वारे ते अघोर अशी संकटे दूर करायचे.

''घुमते घुमते सब जगह देखना और जगा अच्छी मिली, तो वहाँ बैठकर चिंतन करना. ॐ... ॐ... ॐ... ॐ... ॐ... ॐ... हाच त्यांना ध्यास लागला होता.

स्वामी ब्रह्मानंद कोणत्या पंथामध्ये गणले जातात, हे माहीत नाही. त्यांच्या अंगी महान योगसामर्थ्य होते. त्यांना हटयोगी म्हणता येणार नाही ; कारण ते नेहमी ईश्वर चिंतनात मग्न असत. त्यामुळे त्यांना भक्तीयोगी असेच म्हणावे लागेल.

आमच्या भारतीय संस्कृतीचा जो वारसा संतांनी खांद्यावर घेतला, तोच वारसा ब्रह्मानंदांनी भक्तिमार्गाने नावारूपाला आणला. त्यांनी आपली शिकवण तत्त्वज्ञानाच्या भाषेत सांगितली नाही, तर परमात्म स्वरूपाचे चिंतन करून ती शिकवण आपल्या अंगी बिंबवली. आज वेंगुर्ले, मालवण व मुंबई इत्यादी परिसरांत स्वामींचे असंख्य भक्त पसरलेले आहेत.

ब्रह्मानंद हे स्वतः कारवारी भाषिक होते. त्यामुळे मालवणी व कारवारी ह्या

मायबोलींमध्ये कोकणीची परंपरा राखण्याचे काम स्वामींनी केले. आपल्या दैदीप्यमान सामर्थ्याने ब्रह्मानंदांनी ह्या परिसरातील निसर्ग देवतेला जागृत केले आणि निर्मनुष्य जागेत चैतन्याचा कल्लोळ उठवून भक्तीची मोहिनी सर्वांवर घातली. जे अनाथांचे नाथ गणले गेले, ते स्वामी नाथपंथीय असतील, यात शंका नाही.

स्वामी जेव्हा मुंबईस येत, तेव्हा मुक्कामासाठी एखाद्या भक्ताच्या घरी थांबत. दिवसा मात्र मुंबईच्या एका टोकास, समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या बाणगंगेच्या स्मशानात जावून एकटेच बसत. त्याठिकाणी असलेल्या एका धर्मशाळेच्या छताखाली तासन्‌तास बसून अथांग समुद्राकडे पहात भावसमाधिस्थ होत.

स्वामी मुंबईला ज्या भक्ताच्या घरी येत असत, त्या भक्ताला इमारत उभी करण्यापूर्वी या ठिकाणी औदुंबराची पाच झाडे होती, ती तोडावी लागली होती. स्वामींनी आपल्या मुंबईतील विसाव्यासाठी पार्ले येथील जागा निवडली. त्यांचे वास्तव्य झाले मालवण तालुक्यातील खेडेगावात – थंडगार पाणवठ्याच्या ठिकाणी, तर अखेर झाली मुंबई येथील पार्ले या ठिकाणच्या परमभक्ताच्या औदुंबराच्या छायेत. तो शिष्यही असा की ॐकाराच्या नामजपाने पावन झालेला.

ब्रह्मानंद स्वामींनी लोकसंग्रहाकरिता आणि लोकजागृतीकरिता ज्याप्रमाणे समराधना घालण्याची प्रथा सुरु केली, त्याचप्रमाणे वार्षिक उत्सव, गुरुपौर्णिमा आणि श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी या ठिकाणी महाप्रसादाचा कार्यक्रम चालू असतो. आज स्वामींच्या निर्वाणानंतरही ते कार्यक्रम अगदी तसेच भक्तांद्वारे साजरे केले जातात. आता ह्या उत्सवामध्ये स्वामींची पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.

६ जून १९७३ साली हा तेजस्वी तारकापुंज दिक्कालाच्या नक्षत्रात कायमचा विलीन झाला. संध्याकाळपर्यंत भक्तांची पार्ले मुक्कामी गर्दी झाली होती. ॐच्या अद्याक्षराने त्यांनी सर्वस्वाचा त्याग करून स्वर्गलोकी प्रयाण केले. त्यांच्या आवडत्या ओझर स्थळीच स्वामींना समाधी देण्याचा त्यांच्या भक्तांनी निर्णय घेतला. एक खास मोटार ठरविण्यात आली. स्वामी ब्रह्मानंदांचे कलेवर भजनाच्या नादात ओझरला नेण्यात आले.

पारंपारिक रूढी आड आल्यामुळे मनात असूनही स्वामींना ओझरला समाधी घेता आली नाही; कारण एखाद्या धार्मिक स्थळी अंत्यसंस्कार होऊ शकत नाहीत; म्हणून स्वामींना रेवंडी गावची सामादेवी, सर्जेकोट, कोळंब येथील समुद्रकिनाऱ्यालगत अग्नी देण्यात आला.

समुद्राचे त्यांचे आकर्षण एवढे गूढ होते! स्वामींच्या काही अस्थी त्यांच्या आवडत्या अथांग सागरात विसर्जित करण्यात आल्या. उरलेल्या अस्थींचे दोन कलश करून वेंगुर्ले येथील नारायण मंदिरात एक आणि दुसरा कलश ओझर येथे नेण्यात आला. त्या अस्थीकलशावर स्वामींची समाधी दोन्ही ठिकाणी बांधण्यात आली. स्वामी समाधीरूपाने आजही ओझरेश्वराच्या परिसरात सर्वांना आपले अस्तित्त्व पटवून देत आहेत.

---


श्रीकृष्ण : मनबुद्धीला सहज न कळते
अव्यक्तातील ब्रह्म सनातन
पंचभूतमय या देहाला
कष्टविते ते दुर्गम साधन

श्रीकृष्ण : अर्पून कर्मे मम चरणावर
अनन्य भजती मजला जे जन
जन्ममृत्युच्या या चक्रातून
मीच तयाना घेतो उचलून
मम हृदयासी धरितो प्रेमे
अविलंबे मी त्या उद्धरितो
योगक्षेम नित त्यांचा वाहून
पैल भवाच्या त्यास सोडितो

श्रीकृष्ण : मन जडवावे माझ्या पायी
भाव स्थिरावा माझ्या ठायी
मिळवून वृत्ती माझ्या स्वरूपी
माझा होऊन संतत राही
ध्यानयोगी तू जरी न रमसी
कर्मे माझ्या पदि अर्पावी
ब्रह्मार्पण हे करून जीवन
कर्मयोगी तू मति स्थिरवावी
इतुकेही नच जर घडेल हातून
त्यजून कर्मफल तू वर्तावे
बुडवून चित्ता अखंड स्मरणी
फलाशेस तू अंतर द्यावे

- गीता

---



# गुरुस्थान

- सौ. निर्मला चं. मालवणकर
दादर (पूर्व), मुंबई.





साईबाबा शिरडीला येण्यापूर्वी ते एक लहानसे खेडे होते. तेथे येऊन बाबांनी निंबाच्या झाडाखाली बारा वर्षे तप केले. त्या स्थानाला त्यांनी माझ्या गुरुचे स्थान म्हटले.

श्री साईबाबांनी श्री साईसत्‌चरितात म्हटले आहे-

''म्हणे माझ्या गुरुचे स्थान। अति पवित्र हे माझे वतन
आहे तैसे करा जतन। माना मद् वचन एवढे''

त्याप्रमाणे गुरुस्थानाचे आजवर जतन झाले आहे. निंबाखाली त्या जागेला आज पावित्र्य आले आहे. प्रत्येक भक्त तेथे नतमस्तक झाल्याशिवाय रहात नाही. गुरुवारी व शुक्रवारी धूप घालण्यास बाबांनी सांगितले असले, तरी भक्त नेहमी गुरुस्थानात आल्यावर भक्तिभावाने धूप घातल्याशिवाय जात नाहीत. असे आहे बाबांच्या गुरुस्थानाचे महात्म्य.

बाबांनी समर्थस्वामींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली वीट आपल्या बरोबर आणली. तिला ते, ''माझ्या जन्माची सांगातीण'' म्हणत असत. जेव्हा ती फुटली, त्यावेळेस त्यांना फार दुःख झाले. दुःखाने म्हणाले, माझे कर्म फुटले. त्यानंतर ते फार दिवस राहिले नाहीत. ध्यान करताना व समाधिस्थ बसताना ते विटेवर हात टेकून बसत असत. समर्थांची आठवण ते आपल्या अंत:करणात सदैव जपून असत.


# संत गजानन शेगांवीचा-शिरडीचा साई

- सौ. मृ. ह. पुंडलिक
कल्याण, ठाणे.





मानवी जीवन सुखी, संपन्न करण्याचे अनेक मार्ग आहेत; त्यापैकी एक मार्ग म्हणजे उपासना. श्री साई व श्री गजानन एका नाण्याच्या दोन बाजू. साक्षात् प्रेमाची प्रतिके म्हणून, शिरडी आणि शेगांव दोन्ही प्रती पंढरपुरच. प्रत्यक्ष परमात्मा दोन रूपांत अवतरून भक्तांच्या मनोकामना पूर्ण करीत आहेत. श्री साईसत्‌चरित आणि श्री गजाननविजय हे दोन्ही प्रसादरूपी ग्रंथ भक्तजनांना त्यांच्या संकटातून तारून नेत आहेत. ही दैवते सदासर्वदा भक्तांच्या हाकेची प्रतिक्षा करीत प्रतिती देत आहेत. श्री साई गजानन ही आधाररूपी दैवते असल्याने आपली काळजी त्यांनाच असते. त्यामुळे कोणत्या रूपाने येऊन संसाररूपी भयाचा ते नाश करतील, हे समजणार नाही. कलियुगात नामाचा महिमा श्रेष्ठ असल्यामुळे फक्त नामस्मरण हा सोपा उपाय आहे. शरणभाव मनी जागविणे, हीच खरी दक्षिणा होय! आपल्याला दर्शनाची उत्कट इच्छा, ध्यास असल्यावर प्रत्यक्ष दर्शन होते, असा स्वानुभव कितीतरी भक्तांचा आहे. त्यांच्यावरील प्रेमामुळे, निष्ठेमुळे शेगांव, शिर्डी येथे गेल्यावर मनुष्य अनोख्या भावविश्वात रमून जातो. जातो माघारी ...म्हटल्यावर कसे अगदी जीवावर येते. पाय उचलत नाहीत. कितीही त्रास असला, तरी दर्शनाची ओढ काय असते. आज शेगांवही शिर्डीप्रमाणेच आहे. बाबांप्रमाणेच श्री गजानन महाराजांची समाधीही इतर पवित्र क्षेत्रांप्रमाणे अत्यंत जागृत स्थान आहे. श्री साईबाबा आणि श्री गजानन महाराज हे दोन नाहीतच. त्यामुळे शेगांवला गेल्यावरही मनुष्य पुन्हा लवकर दर्शनाला येण्याचे



ठरवूनच परततो. अद्वैतच असल्यावर तुलना कशाची आणि कोणाशी करायची! सर्व रूपे त्या अनंत अनादी परमेश्वराचीच.

**आकाशांत पतितं तोयं। यथा गच्छती सागरम्।**
**सर्व देवं नमस्कार:। केशवं प्रति गच्छती।**

शेवटी सर्व जगावर नियंत्रण करणाऱ्या परमेश्वरा, तू कोणत्याही रूपाने अवतार घेऊन सर्व भक्तजनांचे रक्षण कर, ही विधात्याच्या चरणी नम्र प्रार्थना.

**श्रीकृष्ण :** द्वेष नसावा कधी कुणाचा
कारूण्याने भर हृदयांगण
क्षमावान हो वसुंधरेसम
सुखदु:खाना मान समान

**श्रीकृष्ण :** जग ज्या संगे न होय पीडित
हर्षामर्ष विहिन असा नर
विश्वभान ज्या नाही उरले
असा भक्तवर मजला प्रियतर
मान दु:ख अन् संग विहीन
शत्रुमित्र जो मानी सम नर
समनिंदास्तुति आत्मतुष्ट जो
असा भक्तवर मजला प्रियतर

- गीता


## स्मरण

# श्री साईसत्‌चरित - अध्याय १

* श्री साईसत्‌चरित लिहिणाऱ्या साईभक्ताचे संपूर्ण नाव व उपनाव काय?
* श्री साईसत्‌चरितात एकूण किती अध्याय आहेत?
* श्री साईसत्‌चरिताचे पारायण करताना एका सप्ताहात प्रत्येक दिवशी किती अध्याय वाचले जातात?
* श्री साईसत्‌चरितकार कुणाच्या गोत्रातील होते?
* श्री साईसत्‌चरितकारांच्या पितामहांचे व पित्याचे नाव काय?
* श्री साईबाबांचे शिरडीत साधारणपणे किती वर्षे वास्तव्य होते?
* श्री साईबाबांनी गव्हाच्या रूपात जात्यात काय भरडले?
* जात्याचे दोन पाटे व मूठ म्हणजे काय?
* जात्याचा असाच एक अनुभव एका संताने एका स्त्रीला दिला होता, त्या संताचे नाव काय?

(उत्तरे अन्यत्र)

* कबीर
* वरचा पाटा म्हणजे भक्ती, दुसरा पाटा म्हणजे कर्म व मूठ म्हणजे ज्ञान
* महामारी
* ६०
* सदाशिव, रघुनाथ
* ऋषिराज गोत्रस्वामी भारद्वाज
* अष्ट, अष्ट, सप्त, अष्ट, षट्, अष्ट, सप्त
* ५३
* कै. श्री. गोविंद रघुनाथ दाभोलकर उपाख्य हेमाडपंत



चिंतन - फकीर

# धर्म

ह्या विश्वात अनेक धर्म, जाती, पंथ, संप्रदाय आहेत. भारतात हे प्रामुख्याने पहावयास मिळते. विविधतेत एकात्मता साधण्याचे महान कार्य भारत पार पाडत आहे. परंतु आपलाच धर्म महान असून तो इतर धर्मियांच्या गळी उतरविण्याचा आटापिटा काही धर्मांध लोकांकडून होत आला आहे. ह्या लोकांना प्रत्येक धर्मात असलेले ''प्राणीमात्रांची सेवा'' हे मुख्य तत्त्व कळलेच नाही, असे खेदाने म्हणावे लागते.

माणसाची जात ही त्याच्या जन्मावरून नव्हे, तर त्याच्या विचार-आचारात पहावी, असे संत-महंतांचे म्हणणे आहे, ते अगदी खरेच आहे.

निर्मळ, विशुद्ध, पवित्र, दिव्य, भव्य सौंदर्यावर, वस्तूंवर कुटिलता किंवा संदेह न ठेवता निरलस प्रेम करणे, त्यांची जपणूक करणे, हेच खऱ्या धर्माचे लक्षण आहे, हाच त्याचा यथार्थ भाव आहे, असे जे समजतात व तसे वागतात, त्यांनीच खरा धर्म ओळखलेला असतो.

दयामय, सर्वव्यापी परमात्मा एकच असून त्याच्याच वेगवेगळ्या रूपांची भिन्न भिन्न मार्गांनी आपण पूजा करीत असतो, असे जे मानतात, त्यांनाच खरा धर्म कळलेला असतो.

सर्व विधायक अवस्थांत मोबदल्याची अपेक्षा न धरता समर्पण बुद्धीने, नि:स्वार्थपणे जे काम करतात, त्यांनाच खरा धर्म उमगलेला असतो.

अनाथ बालकांच्या, अपंगांच्या, रूग्णांच्या हृदयद्रावक केविलवाण्या नजरेने ज्यांचे हृदय द्रवते, निराधार विधवांची, अबलांची दुरावस्था पाहून ज्यांचे डोळे पाणवतात, त्यांनाच खरा धर्म जाणवलेला असतो.

जी सुखी माणसे जेव्हा दुसऱ्या दु:खी माणसांच्या दु:खात सहभागी होतात, त्यांच्या दु:खाचे वाटेकरी बनतात, त्यांनाच खरा धर्म समजलेला असतो.

एका आत्म्याचे दुसऱ्या आत्म्याशी व सर्व आत्म्यांचे त्या परमात्म्याशी संबंध जोडलेले आहेत, असे समजून जे दुसऱ्या जीवांवर प्रेम करतात, त्यांची सेवा करतात,

तेव्हा त्यांचा तो खरा धर्म असतो.

आपण ह्या क्षणी आहोत, पुढच्या क्षणी मात्र आपण असूच असे नाही ; परंतु आपण विधायक कार्यात मग्न राहिलो, तर शरीराचा त्याग केल्यानंतर ह्या जगात आपण आपल्या ह्या कार्याच्या रूपाने अमर राहू, अश्या धारणेने जे वागतात, तेच खरा धर्म जगत असतात.

अशा ह्या धर्माचे केवळ वाचन, श्रवण उपयोगाचे नाही, तर हा धर्म प्रत्यक्ष आचरणात आणला पाहिजे.

## जय जय साई समर्था

जय श्री सद्गुरु साई समर्था।।धृ।।
झाली प्रेरणा, आले शिरडी गांवा
साई समर्थाचे दर्शन घ्यावया
जन्माचे या सार्थक जहाले।।१।।

शिरडी ग्रामी प्रवेश होता
मूर्ती साईंची नयनी दिसता
अति आनंदे ऊर दाटतां
प्रेमाश्रू नयनी झरले।।२।।

घ्यावी भिक्षा साई पासूनी
म्हणून बैसले पदर पसरूनी
समर्थ साई प्रेमे हसूनी
कृपा मेघ बरसले।।३।।

मन गहिवरते शिरडी सोडता
श्री साईंचा निरोप घेता
दया येऊनी साई समर्था
प्रेमे संगती ते माझ्या आले।।४।।

– सौ. शैलजा कुलकर्णी
ठाणे.

# तू सुखकर्ता, तू दुःखहर्ता
# तू सकलांचा भाग्यविधाता



आदी दैवत म्हणून श्री गणरायाची पूजा-अर्चा भारतवर्षात सर्वत्र केली जाते. आता तर परदेशांतही काही ठिकाणी ह्या देवतेचे पूजन केले जाते. ह्या देवतेचे पूजन पूर्वी कुटुंबापुरते मर्यादित होते; परंतु लोकमान्य टिळकांनी ते सार्वजनिक केले, हे सर्वविदित आहे. पुराणांमध्ये श्री गणेशाची जी एकवीस शक्तिकेंद्रे आहेत, त्यातील आठ क्षेत्रे महाराष्ट्र राज्यात आहेत. ह्या अष्टविनायकातील पाच पुणे जिल्ह्यात, दोन रायगड जिल्ह्यात, तर एक अहमदनगर जिल्ह्यात आहे. महाराष्ट्रातील ह्या अष्टविनायक दर्शनाला देशाच्या कानाकोपऱ्यातून, तसेच परदेशांतूनही पर्यटक येत असतात. ह्या अष्टविनायकांची नावे व ठिकाणं पुढीलप्रमाणे :

(१) पुण्यातील मोरगावचा श्री मोरेश्वर (२) पुण्यातील थेऊरचा श्री चिंतामणी (३) रायगडमधील पालीचा श्री बल्लाळेश्वर (४) रायगडमधील महडचा श्री वरदनायक (५) पुण्यातील लेण्याद्रिचा श्री गिरिजात्मज (६) पुण्यातील ओझरचा श्री विघ्नेश्वर (७) पुण्यातील रांजणगावचा श्री महागणपती (८) अहमदनगरमधील सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक

श्री मोरेश्वराच्या मंदिराचे मुख उत्तरेकडे आहे. मूर्तीचे मुख पूर्वेकडे आहे. ही मूर्ती बसलेल्या अवस्थेत असून तिची सोंड डावीकडे आहे. मूर्तीच्या समोरच्या बाजूला उंदीर व नंदी आहे. मूर्तीच्या नयनांत हिरे बसविलेले आहेत. प्रशस्त मंडपात आठ बाजूंना आठ गणपती स्थानापन्न आहत.

श्री चिंतामणीच्या मंदिराचे मुख उत्तरेकडे आहे, तर मूर्तीचे मुख पूर्वेकडे आहे. ह्या मूर्तीची सोंड डावीकडे असून ती मांडी घालून बसलेल्या अवस्थेत आहे.

श्री बल्लाळेश्वराच्या मंदिराचे मुख जसे पूर्वेकडे आहे, तसेच मूर्तीचे मुखही पूर्वेकडेच आहे. येथे लागलीच नजर वेधून घेणाऱ्या गोष्टी, म्हणजे ह्या मंदिराचे भारदस्त बांधकाम व प्रचंड घंटा!

श्री वरदविनायकाच्या मंदिराचे मुख पूर्वेकडे आहे. मूर्तीचे मुख उजवीकडे आहे, तर मूर्तीची सोंड डावीकडे आहे. येथे एक नंदादीप आहे; तो निरंतर प्रज्वलित असतो.

श्री गिरिजात्मजाच्या मंदिराचे मुख दक्षिणेकडे आहे. ह्या मंदिराचे खडकांत कोरीव काम केलेले आहे. हे मंदिर चढण्यासाठी सुमारे ३०२ पायऱ्या आहेत. मंदिरातील मूर्तीचे कोरीव काम दगडात केलेले आहे. मूर्तीचे मुख उत्तरेकडे आहे. येथे चट्‌कन नजरेत भरतो, तो एकाही खांबाचा आधार नसलेला, दगडातच कोरलेला सभामंडप.

श्री विघ्नेश्वराच्या मंदिराचे मुख जसे पूर्वेकडे आहे, तसेच मूर्तीचे मुखही पूर्वेकडे आहे. ह्या मूर्तीची सोंड डाव्या बाजूला आहे.

श्री महागणपतीच्या मंदिराचे मुख पूर्वेकडे आहे.

श्री सिद्धिविनायकाच्या मंदिराचे मुख जसे उत्तरेकडे आहे, तसेच मूर्तीचे मुखही उत्तरेकडेच आहे. मूर्तीची सोंड उजवीकडे आहे.

ह्या अष्टविनायक दर्शनाला तीर्थक्षेत्रांमध्ये विशेष महत्त्वाचे स्थान आहे, ते त्यातील मंदिराची उभारणी, मूर्तीची ठेवण अशा काही वैशिष्ट्यांमुळे व त्यांतील जागृततेमुळे. ह्या अष्टविनायकांची नवसाला पावणारे गणपती म्हणून ख्याती आहे. अष्टविनायकांची नावे सामाविष्ट असलेला व बहुतेक गणेशभक्तांच्या मुखी असलेला श्लोक पुढीलप्रमाणे:

स्वस्ति श्री गणनायको गजमुखो मोरेश्वर: सिद्धिद:।
बल्लाळस्तु विनायक स्त्वथ मढे चिंतामणि स्थेवरे।
लेण्याद्रौ गिरिजात्मज: सुवरदो विघ्नेश्वरश्चोझरे।
ग्रामे रांजणसंस्थितो गणपति: कुर्यान [illegible] मंगलम्।